MHAH190004752016

| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | – | २६/०४/२०१६ |
| नोंदणी दिनांक | – | २६/०४/२०१६ |
| निकाल दिनांक | – | ०९/०३/२०२६ |
| कालावधी | – | ०९ व. १० म. १३ दि. |

**शेवगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.०२), ता. शेवगाव,**

**जि. अहमदनगर यांचे न्यायालयात..**

**(पीठासीन अधिकारी वैशाली सं.मोरे)**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९८/२०१६** **निशाणी.क्र. ४८**

| | |
|---|---|
| **अर्जदार** | **यशोदा देवगुण बोरूडे,उर्फ कल्पना रामनाथ ढाणके,**<br>वय: ४५ वर्षे, कामधंदा:– काही नाही.<br>रा. सोनेसांगावी, ता. शेवगाव जि. अहमदनगर. |
| **अर्जदारा तर्फे** | विधीज्ञ श्री. एस. पी. बर्डे वकील. |
| **सामनेवाला** | **१. रामनाथ मारूती ढाणके,**<br>वय: ५८ वर्षे, कामधंदा: नोकरी,<br>**२. सुनंदा रामनाथ ढाणके,**<br>वय: ५० वर्षे, कामधंदा: घरकाम,<br>**३. मयुर रामनाथ ढाणके,**<br>वय: २१ वर्षे, कामधंदा: शिक्षण,<br>सर्व रा. विद्यानगर,मिरी रोड शेवगाव,<br>ता. शेवगाव, जि. अहमदनगर. |
| **सामनेवाला तर्फे** | विधिज्ञ व्ही. डी. लांडे वकील. |
| **अर्ज –** | **महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन सरंक्षण कायदा २००५ चे कलम १२ आणि १८, १९, २० व २२ अन्वये** |

## न्यायनिर्णय

( जाहिर दिनांक ०९/०३/२०२६)

०१. अर्जदार हीने प्रस्तुतचा अर्ज "महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा" (यापुढे संक्षिप्तपणे 'कायदा' असे संबोधले आहे) कलम १२ अन्वये कलम १८, १९, २०, २२ प्रमाणे अनुतोष मिळणेसाठी दाखल केला आहे.

### अर्जदाराचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –

०२. अर्जदाराचे लग्न सन १९८२ साली सोनेसांगवी, ता. शेवगाव येथील देवगुन बोरुडे याचे सोबत झाले. त्याचे पासुन अर्जदार हिस पुजा, रिना या मुली व रवि नावाचा मुलगा झाला. देवगुन बोरुडे हा सन १९९८ साली मयत झाला. त्यानंतर अर्जदार हिस मुलांचे पालणपोषण व शिक्षणाचा खर्च करणे शक्य नसल्यामुळे तिने मुलांना शिक्षणासाठी बहिणीकडे ठेवले व ती एकटी सोनेसांगवी या गावी रहात होती. सामनेवाला क्र.०१ हा देवगुन बोरुडे याचा मित्र होता त्यामुळे देवगुनच्या हयातीमध्ये तो अर्जदार हिचे घरी जात येत असे व देवगुनच्या मृत्यूनंतर देखील अर्जदार हिचेकडे येत असे व ख्याली खुशाली विचारत असे. सन २००८ मध्ये सामनेवाला क्र.०१ हा गोळेगाव शेकटे येथे कामगार तलाठी म्हणून नोकरीस होता. नोकरीच्या गावावरुन येतांना तो अर्जदार हिचे घरी येत असे. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र.०१ मध्ये प्रेमाचे संबंध निर्माण झाले. सामनेलवाा क्र.०१ अर्जदार हिचे घरी मुक्कामास राहु लागला. अर्जदाराचे नातेवाईक विरोध करु लागल्यामुळे सामनेवाला क्र.०१ व अर्जदार यांनी माळेगाव येथील महादेव मंदिरात एकमेकांस हार घालुन पती पत्नी म्हणून स्विकार केला. तेव्हा पासुन अर्जदार व सामनेवाला क्र.०१ हे पती पत्नी सारखे एकत्र राहु लागले. सामनेवाला क्र.०१ हा आठवड्यातले दोन ते तीन दिवस सोनेसांगवी येथे मुक्कामास रहात असे व इतर दिवस शेवगाव येथील त्याचे घरी सामनेवाला क्र.०२ व ०३ यांचे बरोबर रहात असे.

०३. सन २००९ साली सामनेवाला क्र.०१ याची पारनेर तालुक्यात बदली झाली त्यामुळे त्याने पारनेर येथे दत्तु घोडके याचे घर भाड्याने घेतले. तिो अर्जदार व सामनेवाला क्र. ०१ पती पत्नी प्रमाणे राहु लागले. त्यानंतर सन २०११–१२ मध्ये अर्जदार व सामनेवाला क्र.०१ हे टाकळी ढोकेश्वर तालुका पारनेर या गावी संपत कराळे

याच्या घरी भाड्याने एक ते दिड वर्षे पती पत्नी म्हणून राहिले. त्यानंतर सन २०१२–१३ चे दरम्यान सामनेवाला क्र.०१ याची चापडगाव ता. शेवगाव येथे मंडल अधिकारी म्हणून बढतीवर बदली झाली. चापडगाव ते सोन सांगवी या गावा दरम्यान दोन ते तीन कि.मी अंतर असल्यामुळे सामनेवाला क्र. ०१ हा पूर्वी प्रमाणेच आठवडयातून तीन ते चार दिवस अर्जदाराकडे सोने सांगवी येथे राहु लागला.

०४. सन २०१६ मध्ये माहे जानेवारी मध्ये अर्जदार व सामनेवाला क्र.०१ यांचे नाते संबंधांबाबत सामनेवाला क्र.०२ व ०३ यांना माहिती झाली. त्यामुळे सामनेवाला क्र.०२ व ०३ हे अर्जदार क्र.०१ चे घरी सोने सांगवी येथे येऊन अर्जदारास शिवीगाळ व दमदाटी करु लागले व म्हणु लागले की, तू सामनेवाला क्र.०१ चा नाद सोडून दे, नाही तर तुझा काटा काढु. त्यांनी सामनेवाला क्र.०१ चे कान भरवले. त्यामुळे सामनेवाला क्र.०१ याने सुध्दा अर्जदार हिस मारहाण करण्यास सुरुवात केली व तिला बहिणीच्या गावी राहावयास जा असे म्हणाला. दिनांक २४/०३/२०१६ रोजी, सामनेवाला क्र.०१ ते ०३ सांय. ०५.०० ते ६.०० वा. चे सुमारास, सोने सांगवी येथे अर्जदाराच्या घरी आले व तिला म्हणाले की, तू येथे राहु नको, तुझ्या बहिणीच्या गावी निघुन जा. त्यांनी तिला केसांना धरुन घराबाहेर ओढून काढले व लाथाबुक्यांनी मारहण केली. तिचा ओरडण्याचा आवाज ऐकून गावातील बाळासाहेब फडके, संजय आंधळे, गंगाधर मडके हे तेथे आले व त्यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर सामनेवाला क्र.०१ ते ०३ हे तेथून निघुन गेले. तेव्हापासुन सामनेवाला क्र.०१ हा अर्जदाराकडे आला नाही, तिच्या अन्नवस्त्राची व्यवस्था लावली नाही. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती सामनेवाला क्र.०१ वर सर्वस्वी अवलंबून आह. तिला अन्नवस्त्रासाठी रु.१०,०००/–, शारीरिक व मानसिक त्रासाबाबत नुकसान भरपाई म्हणून रुपये १०,००,०००/–(दहा लाख), तिच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी व सामनेवाला पासुन संरक्षण मिळणेसाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०५. सामनेवाला क्र.०१ ते ०३ यांनी अर्जाचे कामी हजर होऊन त्यांचा खुलासा निशाणी क्र. ११ अन्वये दाखल केला आहे. सामनेवालांनी अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. त्यांचे कथनानुसार, सामनेवाला क्र.०१ याची अर्जदाराचे पतीशी

कधीही ओळख नव्हती. सामनेवाला क्र.०१ ची बदली सोनेसांगवी येथे असतांना त्याचे कार्यालय राक्षी येथे होते. त्यामुळे सोनेसांगवी येथे अर्जदाराचे घरी जाण्याचा अथव अर्जदाराशी ओळख होण्याचे काहीएक कारण घडलले नाही. सन २००७ साली सामनेवाला क्र.०१ याची पारनेर तालुक्यात बदली झाली होती व तेथे कार्यरत असल्यामुळे सन २००८ मध्ये अर्जदार हिचे घरी जाण्याचा अथवा माळेगाव येथील महादेव मंदिरामध्ये एकमेकांस हार घालुन पती पत्नी म्हणून स्विकार केले बाबतची अर्जदाराची कथने ही काल्पनिक आहेत. तसेच अर्जदार हिस पारनेर येथे बरोबर घेऊन राहिल्या बाबतची कथने ही खोट्या स्वरुपाची आहेत. सन २०१४ मध्ये सामनेवाला क्र.०१ ची पदोन्नती होऊन शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथे मंडल अधिकारी म्हणून नेमणुक झाली. सामनेवाला क्र.०१ चापडगाव येथील कार्यालयात शेवगाव येथून जा–ये करीत असे. तो कधीही सोने सांगवी येथे अर्जदार हिचे घरी गेलेला नाही. चापडगाव मंडळामध्ये नेमणुक झाल्यानतर बाळासाहेब मडके याची एक मिळकत सरकार जमा करण्याबाबत मा. न्यायालयाने आदेश केलेला होता. सामनेवाला क्र.०१ हा मंडल अधिकारी म्हणून कार्यरत असतांना कामगार तलाठी यांनी मिळकत शासन जमा करणेबाबत घेतलेली नोंद सामनेवाला क्र.०१ यांनी मंजूर करु नये यासाठी बाळासाहेब मडके व इतर सहकारी यांनी सामनेवाला क्र.०१ याचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला परंतु, सामनेवाला क्र.०१ यांनी मिळकत सरकार जमा करण्याचा फेर मंजूर केला. त्यामुळे बाळासाहेब मडके व त्याच्या सहका–यांनी सूड बुध्दीने सामनेवाला क्र.०१ यांना त्रास देण्याच्या वाईट हेतून अर्जदार हिला हाताशी धरुन प्रस्तुतचा खोट्या स्वरुपाचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. अर्जदार व सामनेवाल्यांचे तत्थकथने, पुरावा, युक्तीवाद व दाखल कागदपत्रांवरुन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले आहेत, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येतात.

| क्र. | मुद्दे | निष्कर्षे |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की तिचे महिलांचे कौंटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमा मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामनेवालांशी कौटुंबिक नातेसंबंध आहे ? | ...नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की सामनेवालांनी तिला कौटूंबिक हिंसाचार केला आहे ? | ...नकारार्थी |
| ३. | अर्जदार हिने हे सिध्द केले आहे काय की, ती कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमा प्रमाणे संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहे ? | ...नकारार्थी |
| ४. | अर्जदाराने सिध्द केले आहे काय की अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून रक्कम दरमहा रुपये १०,०००/- अन्न, वस्त्र,औषधोपचार व घर खर्चासाठी मिळणेस पात्र आहेत ? | ...नकारार्थी |
| ५. | अर्जदाराने सिध्द केले आहे काय की, सामनेवाला क्र.०१ कडून तिची निवासाची व्यवस्था करुन मिळण्यास पात्र आहे ? | ...नकारार्थी |
| ६. | अर्जदाराने सिध्द केले आहे काय की ती सामनेवाला क्र.१ कडून रु.१०,००,०००/- नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे ? | ...नकारार्थी |
| ७. | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

०७. अर्जदार हिने तिच्या अर्जातील कथने शाबीत करण्यासाठी तिचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.१४ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०२ बाळासाहेब मडके यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.२५ दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने कागदोपत्र यादी निशाणी क्र.०४ सोबत चार फोटोग्राफ्स, महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र व एक सोन्याच्या दागिन्यांची पावती दाखल केली आहे.

०८. सामनेवाला तर्फे अर्जदारांच्या साक्षीदारांची उलटतपाणी घेण्यात आली. तसेच साक्षीदार क्र.०२ याने सामनेवाला क्र.०१ व इतरांना पाठविलेली नोटीसची निशाणी क्र.२९ दाखल केली आहे. या व्यतिरिक्त सामनेवालाने कोणताही पुरावा दाखल केला नाही.

०९. अर्जदाराच्या वतिने लेखी युक्तिवाद दाखल केला आहे. सामनेवालाचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः–</u>**

१०. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ अन्वये मिळणारे अनुतोष हे पूर्णपणे कौटुंबिक नाते संबंधांवर आधारीत आहे. कलम २ (अ) अन्वये पीडित व्यक्तीचे हिंसाचार करणा–या व्यक्तीशी कौटुंबिक नाते संबंध असणे आवश्यक आहे. कलम २ (फ) अन्वये कौटुंबिक नातेसंबंधामध्ये सदर पीडित व्यक्ती हिंसाचार करणा–या व्यक्ती सोबत रक्ताच्या नातेसंबंधाने, लग्न संबंधाने किंवा लग्ना सारखे संबंधाने किंवा दत्तक संबंधाने अथवा इतर कौटुंबिक संबंधाने एकत्रित घरामध्ये रहात असणे अथवा काही काळासाठी राहिली असणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराचे सामनेवालांशी वरती नमूद प्रकारापैकी कौटुंबिक नातेसबंध आहे हे सिध्द होणे आवश्यक आहे.

११. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराचे कथन आहे की, सामनेवाला क्र.०२ ही सामनेवाला क्र.०१ ची लग्नाची पत्नी व सामनेवाला क्र.०३ हा मुलगा आहे. अर्जदाराचे पती देवगुन बोरुडे सन १९९८ साली मयत झाले. सामनेवाला क्र.०१ हा तिच्या पतीचा मित्र असल्यामुळे व सन २००८ च्या दरम्यान गोळेगाव शेकटे येथे तलाठी म्हणून नोकरीस असल्याने तो अर्जदाराकडे सोनेसांगवी येथे असे. त्यामुळे त्यांच्यामध्ये प्रेमाचे संबंध निर्माण झाले व त्यांनी माळेगाव येथील महादेवाचे मंदिरात हार घालुन पती पत्नी म्हणून स्विकार केला तेव्हापासुन ते पती–पत्नी सारखे संबंध ठेवून एकत्र राहु लागले. अर्जदाराचे पुढे कथन आहे की, सानमवोल क्र.०१ हा आठवड्यातील दोन ते तीन दिवस अर्जदाराकडे सोनेसांगवी येथे मुक्कामास रहात असे व इतर वेळी तो त्याचे शेवगाव येथील घरी सामनेवाला क्र.०२ व ०३ यांचे सोबत रहात असे. अर्जदाराने तिच्या सरतपासाच्या शपथपत्रात सदर बाब कथन केली आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये सामेनवाला क्र.०१ याने अर्जदारासोबत कोणतेही संबंध असल्याचे नाकारले आहेत.

१२. अर्जदाराने सामनेवाला क्र.०१ सोबत तिचे कोणत्या तारखेला लग्न झाले हे कथन केले नाही. तसेच तिने सामनेवाला क्र.०१ सोबत लग्न केल्या बाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच साक्षीदार क्र.०२ बाळासाहेब याने

सरतपासात जरी सदर अर्जदार व सामनेवाला क्र.०१ यांनी लग्न केले असे कथन केले असले तरी त्याने उलटतपासात असे मान्य केले आहे की, ते स्वतः सदर लग्नासाठी हजर नव्हते. तसेच इतर कोणताही सदर लग्नाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अर्जदाराने तपासला नाही. याशिवाय, सामनेवाला क्र.०२ ही सामनेवाला क्र.०१ ची प्रथम लग्नाची कायदेशिर पत्नी असल्याचे व सामनेवाला क्र.०१ हा तिच्या सोबत शेवगाव येथे रहात असल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. त्यामुळे अर्जदाराचा सामनेवाला क्र.०१ सोबत विवाह झाला होता ही गोष्ट सिध्द झाली नाही.

१३. अर्जदाराने कथन केले आहे की, ती सामनेवाला क्र.०१ सोबत विवाहा सारख्या संबंधाने एकत्र रहात होती. सामनेवाला क्र.०१ याची बदली गोळेगाव शेकटे येथे असतांना तो आठवड्यातील दोन ते तीन दिवस तिच्या सोनेसांगवी येथील घरी मुक्कामास रहात होता. तसेच सन २००९ मध्ये त्याची पारनेर तालुक्यात बदली झाल्यावर ती सामनेवाला क्र.०१ सोबत दत्तु घोडके यांचेकडे भाड्याने रहिली. तसेच सन २०११-१२ मध्ये ती टाकळी ढोकेश्वर येथे सामनेवाला क्र.०१ सोबत संपत कराळे यांची घरी पती पत्नी म्हणून राहिली. साक्षीदार क्र.०२ बाळासाहेब याने देखील त्याच्या सरतपासात अर्जदाराच्या कथनांचे कथनांचे समर्थन केले आहे. परंतु, साक्षीदार क्र.०२ हा सन १९९८ पूर्वी पासुन अर्जदाराच्या घरा शेजारी रहात असल्याचे कथन आहे, परंतु, त्याला यशोदाचा पती काय काम करत होता हे माहित नसल्याचे उलटतपासात कथन केले आहे. तसेच पारनेर येथे सामनेवाला कोठे रहात होता व कोणत्या गावास नोकरीस होता हे त्याला माहित नाही असे कथन कले आहे. त्यामुळे तो विश्वास पात्र साक्षीदार असल्याचे दिसुन येत नाही. या शिवाय अर्जदाराने यादी निशाणी क्र.०४ सोबत दाखल केलेले सोनाराची पावती दिनांक १७/०३/२०१३ मध्ये कल्पना धानके असे नाव नमूद असुन त्यामध्ये तिच्या पतीचे नाव नमूद नाही. तसेच तिचा पत्ता देखील पारनेर अथवा टाकळी ढोकेशवर असा दिसुन येत नाही. सदरचे सोनाराचे बिल कायदेशिरपणे सिध्द झाले नाही. या शिवाय अर्जदाराने ती सामनेवाला क्र.०१ सोबत पारनेर व टाकळी ढोकेश्वर येथे काही काळासाठी रहात होती हे दाखविणारा कोणताही अधिकृत दस्त दाखल केला नाही. तसेच ज्यांच्या घरी भाडयाने रहात होती त्यांची साक्ष देखील

अर्जदाराच्या वतिने नोंदविण्यात आली नाही. सबब, अर्जदार सामनेवाला क्र.०१ सोबत पारनेर अथवा टाकळी ढोकेश्वर येथे रहात होती ही बाब सिध्द झाली नाही. तसेच अर्जदाराने सामनेवाला सोबतचे तिचे चार फोटोग्राफ्स दाखल केले आहे. तसेच सामनेवालाचे महाराष्ट्र शासनाचे कामगार तलाठी म्हणून चे ओळखपत्र दाखल केले आहे. सामनेवाला क्र.०१ ने त्याच्या उलटतपासात सदरचा फोटो हे त्याचे नसल्याचे कथन केले आहे. तथापि, ओळखपत्र त्याचे असल्याचे मान्य केले आहे. परंतु, अर्जदाराचे सामनेवाला क्र.०१ सोबत कौटुंबिक नाते सबंध होते, ही बाब अर्जदाराने दाखल केलेल्या सदर फोटोग्राफ्स व सामनेवाला क्र.०१ च्या शासकीय ओळखपत्रावरुन शाबीत होत नाही. अर्जदार व सामनेवाला क्र.०१ मध्ये असलेल्या प्रेमसंबंधामुळे सदरचे ओळखपत्र अर्जदाराकडे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरचे फोटो देखील प्रेमसंबंधामुळे अर्जदार व सामनेवाला क्र.०१ यांनी काढले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१४. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे सन २००८ मध्ये व २०१२–१३ ते २०१६ पर्यंत सामनेवाला क्र.०१ अर्जदाराकडे आठवडयातून दोन ते तीन दिवस मुक्कामी रहात होता व उर्वरित दिवस तो त्याचे कुटुंबा समवेत शेवगाव येथे रहात होता. अर्जदाराकडे सामनेवाला क्र.०१ आठवड्यातील दोन ते तीन दिवस मुक्कामास रहात होता असे गृहीत धरले तरी तो अर्जदाराशी कौटुंबिक नातेसबंधाने रहात होता हे सिध्द झाले नाही. प्रस्तुत कायद्यास अपेक्षित असणारे नाते संबंध व अर्जदार पीडित व्यक्ती आहे हे प्रस्थपित होण्यासाठी अर्जदार व सामनेवाला क्र.०१ हे काही काळासाठी कलम (फ) मध्ये नमूद कौटुंबिक नाते सबंधाने एकत्र राहणे आवश्यक आहे. सदर ठराविक काही काळ अखंड असणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार व सामनेवाला क्र.०१ यांचे कलम २ (फ) नुसार कोणत्याही प्रकारचे कौटुंबिक नातेसंबंध होते हे सिध्द झाले नाही. तसेच ते अखंड काही काळासाठी सदर नातेसंबंधाने एकत्रितपणे घरात रहात होते हे सिध्द झाले नाही. अर्जदाराच्या कथनानुसार ती पारनेर व टाकळी ढोकेश्वर येथे सामनेवाला क्र.०१ सोबत सन २००९ ते २०११–१२ पर्यंत अखंड राहिली. परंतु, सदर बाब देखील अर्जदाराने सिध्द केली नाही.

१५. तसेच अर्जदार हिचे असे कथन आहे की, सन २०१६ मध्ये सामनेवाला क्र.०२ व ०३ यांना त्यांच्या संबंधा विषयी माहिती झाली. सन २००८ पासुन जर सामनेवाला क्र.०१ अर्जदारासोबत आठवड्यातील दोन ते तीन दिवस अर्जदाराकडे मुक्कामी रहात होता, व जर तो अर्जदारास पारेनेर व टाकळीढोकेश्वर येथे राहण्यास घेवून गेला होता अशा परिस्थतीत सामनेवाला क्र.०१ ची पत्नी व मुलगा यांना सदर बाब माहिती नव्हती व त्यांना सदर बाब सन २०१६ मध्ये माहिती झाली ही बाब देखील विश्वास पात्र वाटत नाही. त्यामुळे अर्जदाराची कोणतीही कथने सिध्द झाले नाही, हे दिसुन येते. अर्जदाराचे सामनेवाला क्र.०१ सोबत कौटुंबिक नाते संबंध आहे हे सिध्द झाले नाही. सबब, सामनेवाला क्र.०२ व ०३ शी देखील तिचे कौटुंबिक नाते सबंध नाही हे सिध्द होते.

१६. वरती चर्चा केल्याप्रमाणे अर्जदाराने सामनेवाला क्र.०१ ते ०३ सोबत तिचे कौटुंबिक नातेसंबंध आहे, ही गोष्ट प्रस्थापित केली नाही. सबब, सामनेवाला क्र.०१ ते ०३ यांनी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार केला हे शाबीत झाले नाही. त्यामुळे मुद्दा क्र.०१ व ०२ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.०३ ते ०६ करीताः–**

१७. ज्या अर्थी अर्जदाराने सामनेवाला क्र.०१ सोबत कौटुंबित नातेसंबंध असल्याचे सिध्द केले नाही त्या अर्थी प्रस्तुत कायदयानुसार सामनेवाला क्र.०१ कडून संरक्षणार्थ मिळणारे कोणतेही अनुतोष मिळण्यास अर्जदार पात्र नाही. सबब, मुद्दा क्र.०३ ते ०६ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.०७ बाबतः–</u>**

१८. मुद्दा क्र.०१ ते ०६ यांच्या बाबत केलेले विवेंचन, त्यावरील निष्कर्ष व अर्जदार यांची मागणी यांचा एकत्रित विचार करता मुद्दा क्र.०७ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः–

# <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

३ सदर निकालाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VAISHALI SANJAY MORE Digitally signed by VAISHALI SANJAY MORE Date: 2026.03.12 17:53:28 +0530

दिनांकः–०९/०३/२०२६

**( वैशाली स. मोरे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

Name of Court :- Vaishali S. More, Jt. Civil Judge Jr. Div., Shevgaon
Name of Steno :- S. B. Pisal, Stenographer G-III,
Date of Decision Judgment :- 09/03/2026
Signed by Presiding Officer on :- 12/03/2026
Judgment upload on :- 12/03/2026